# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.02.2026** **वारःमंगळवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यात आज मुंबईत चर्चा
2. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवकेंद्रित प्रगतीसाठी करण्याची भारताची कटिबद्धता इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमधून अधोरेखित-पंतप्रधान
3. अजित पवार यांच्या निधनानंतरच्या दुखवट्याच्या काळात 75 शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या निर्णयाला मुख्यमंत्र्याकडून स्थगिती
4. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड 26 तारखेला आणि
5. सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात.

**<u>इमॅन्युएल मॅक्रान</u>**

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांचं तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी काल मुंबईत आगमन झालं. राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांनी राष्ट्राध्यक्ष मॅक्रान यांचं विमानतळावर स्वागत केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांची मुंबईत भेट घेणार आहेत. या भेटीत उभय नेते द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील. पंतप्रधान मोदी यांच्या निमंत्रणावरून इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये सहभागी होण्यासाठी मॅक्रॉन आजपासून तीन दिवसांच्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. आज संध्याकाळी 'भारत-फ्रान्स नवोन्मेष 2026; या कार्यक्रमाचं पंतप्रधान आणि मॅक्रॉन यांच्या हस्ते संयुक्तपणे उद्घाटन होणार आहे. दोन्ही देशांतील आघाडीचे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक आणि नवोन्मेषक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<u>एआय इम्पॅक्ट समिट</u>**

इंडिया एआय इम्पॅक्ट समिट कालपासून नवी दिल्ली इथं सुरू झाली. या निमित्तानं भारत मंडपम इथं उभारलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट एक्सपोचं औपचारिक उद्घाटनही काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री जितिन प्रसाद हे देखील यावेळी उपस्थित होते. यावेळी पंतप्रधानांनी विविध कंपन्या आणि संस्थांनी उभारलेल्या दालनांची पाहणी करून त्यांचं तंत्रज्ञान जाणून घेतलं.

'इंडिया-एआय इम्पॅक्ट समिट 2026' ची संकल्पना 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' अशी आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवकेंद्रित प्रगतीसाठी करण्याची भारताची कटिबद्धता यातून दिसून येते, असं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असून जागतिक विकासात महत्त्वाचं योगदान देत आहे, असं त्यांनी नमूद केलं आहे. या परिषदेच्या माध्यमातून देशातील युवकांची क्षमता आणि कौशल्यही अधोरेखित होत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

ग्लोबल साऊथमध्ये आयोजित करण्यात आलेली ही पहिली जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आहे. पाच दिवसांच्या या शिखर परिषदेमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांच्यासह विविध देशांचे प्रमुख नेते भाग घेणार आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजक, आघाडीचे नेते, धोरणकर्ते आणि तज्ज्ञ या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शंभरहून अधिक देशांना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आलं असून दोन लाखांहून अधिक जणांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

**लोढा**

देशातील पहिल्या 'ए आय लिव्हिंग लॅब'चा काल मुंबईतील रतन टाटा कौशल्य विद्यापीठात शुभारंभ करण्यात आला. स्वदेशी उद्योगांना तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने भारत विश्वगुरू होईल, असा विश्वास कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केला. जर्मनीच्या सहकार्यानं आणि रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. जर्मनीच्या संसदीय राज्यमंत्री डॉ. बार्बेल कॉफ्लर, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री-प्रमाणपत्र रद्द**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात शासकीय दुखवटा असतानाच्या काळातच 75 शाळांना अल्पसंख्याक दर्जा बहाल करणारी प्रमाणपत्र बहाल करण्यात आल्याच्या घटनेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशी अल्पसंख्यांक विकास विभागानं परस्पर केलेल्या प्रमाणपत्र वाटपास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली असून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**राष्ट्रवादी काँग्रेस**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीसाठी येत्या 26 फेब्रुवारीला पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं जाण्याची शक्यता आहे, असं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर काल प्रथमच मुंबईतल्या 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली.

**मुंबई क्लायमेट वीक**

मुंबईत आजपासून मुंबई हवामान सप्ताह अर्थात 'मुंबई क्लायमेट वीक'ला सुरुवात होत आहे. यात तळागाळातील संस्था, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, उद्योग क्षेत्रातील शाश्वतता तज्ज्ञ आणि धोरणकर्ते एकत्र येऊन भारत आणि विकसनशील देशांतील हवामान उपायांवर चर्चा करणार आहेत. 'सारे जहाँ से अच्छा' या कार्यक्रमात, भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा आणि अवकाशवीर शुभांशू शुक्ला विद्यार्थ्यांशी आणि उपस्थितांशी संवाद साधतील. या दोन्ही अवकाशवीरांना क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे.

**सांगली-प्रदर्शन**

65 व्या राज्य कला प्रदर्शनाचं काल सांगलीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. सहा दिवस सुरू राहणाऱ्या या प्रदर्शनात, रेखा रंगकाम, उपयोजित कला, शिल्पकला, मुद्राचित्रण, कला शिक्षक प्रशिक्षण, हस्तकला, मूलभूत अभ्यासक्रम आणि दिव्यांग या विभागांचा समावेश आहे. सांगलीतील कला विश्व महाविद्यालय, शांतिनिकेतनमध्ये 17 ते 22 फेब्रुवारीपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले......

**कला प्रदर्शन पहिल्यांदाच सांगलीमध्ये आपण आयोजित केलं. सांगली आणि कला यांचं खूप नातं आहे वेगवेगळ्या स्तरावर ज्याला म्हणतात की, परीक्षण करत करत बाराशे वेगवेगळ्या प्रकारच्या कलाकृती इथे आल्या आहेत म्हणजे शिल्प आहे चित्र आहे अशा जवळजवळ किंवा टेक्सटाईल मधल्या काही गोष्टी आहेत जसे बाराशे आल्या मी आपल्या माध्यमातून प्रामुख्याने शालेय आणि महाविद्यालय विद्यार्थ्यांना नागरिकांना आवाहन करेन खूप सुंदर प्रदर्शन आहे बघायला एक रुपया शुल्क नाहीये.**

**आसावरी जगदाळे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे हिला शासकीय सेवेत सामावून घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महापालिका आयुक्तांना दिले आहेत. पहलगाम

हल्ल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी जगदाळे कुटुंबीयांची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी जगदाळे कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा यासाठी आसावरीला शासकीय सेवेत सामावून घेण्याचं आश्वासन दिलं होतं.

**<u>सीबीएसई-10वी12वी परीक्षा</u>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सी बी एस ई च्या 10 वी आणि 12वी च्या परीक्षांना आजपासून सुरुवात होत आहे. देशांतील आणि परदेशांतील मिळून 46 लाखांहून जास्त विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. इयत्ता 10 वी च्या परीक्षेच्या नियमांमध्ये मंडळाने काही बदल केले असून, या वर्षीपासून, इयत्ता 10वी साठी दोन वेळा परीक्षा होणार आहे. यातल्या पहिल्या परीक्षेत किमान तीन विषयांचे पेपर द्यावे लागतील. पहिल्या परीक्षेत किमान तीन किंवा त्यापेक्षा जास्त विषयांची परीक्षा दिली नसल्यास त्या विद्यार्थ्याला दुसऱ्या परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.